माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
२४/०८/२०२६

"कृपया प्रसि[illegible] पाठवा

प्रसिद्धीपत्रक

१६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येणाऱ्या 'हत्तीरोग रुग्णशोध मोहिमेत' नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन

सन २०२७ पर्यंत हत्तीरोग दुरीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १६ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'हत्तीरोग रुग्णशोध मोहीम' राबविण्यात येत आहे. या मोहिमेत हत्तीरोगाची बाह्यलक्षणे असलेल्या व अंडवृद्धी रुग्णांचा शोध घेऊन त्यांची अद्ययावत यादी तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम सुरू आहे. या मोहिमेला यश मिळवून देण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, हत्तीरोग या आजाराचे गांभीर्य ओळखून सर्वेक्षण करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करावे.

महानगरपालिकेचे नागरिकांना विशेष आवाहन:

- **स्वत:हून माहिती द्या:** घरात किंवा आजूबाजूला कोणालाही हत्तीरोगाची बाह्यलक्षणे असल्यास, संकोच न बाळगता नागरिकांनी स्वत:हून पुढे येऊन आरोग्य कर्मचाऱ्यांना माहिती द्यावी.
- **कर्मचाऱ्यांना सहकार्य करा:** सर्वेक्षणासाठी येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना अचूक माहिती देऊन त्यांच्या कामात सहकार्य करावे.
- **भीती बाळगू नका:** लक्षणे लपविल्याने धोका वाढतो, त्यामुळे योग्य निदानासाठी आणि अद्ययावत यादीत नाव नोंदवण्यासाठी आरोग्य विभागाला मदत करावी, त्यामुळे पुढील उपचार सोपे होतील.

Paishal (21/8/26)
(डॉ. वैशाली जाधव)
ऑफिसर इन्चार्ज MSU तथा
सहाय्यक आरोग्य अधिकारी,
साथरोग नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका.

(डॉ. निना बोराडे)
आरोग्य अधिकारी,
पुणे महानगरपालिका.